(४)

नवीन रास्तभाव /शिधावाटप दुकान मंजुरीसाठी एकांक संख्या व कार्यपद्धतीबाबत

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक:साविव्य १०००/१३१/प्र.क्र.७२/२०००/नापु २८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२
दिनांक :- ९ जून २०००

शासन निर्णय अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक:साविव्य-१०९९/ २४२४/प्र.क्र.६१७८/नापु २८, दिनांक १२ नोव्हेंबर,१९९९

## शासन निर्णय

नवीन रास्तभाव / शिधावाटप दुकान मंजूर करण्याबाबतची कार्यपद्धती संदर्भाधीन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक रास्तभाव / शिधावाटप ...स जोडावयाच्या अधिकतम एकांकांची संख्या विहित केली आहे.यासंदर्भात मुंबई उच्च ...याने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने याबाबतची सुधारीत कार्यपद्धती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

रास्त भाव / शिधावाटप दुकानास जोडावयाच्या एकांकाची कमीत कमी व जास्तीत संख्या खालील प्रमाणे राहील.

| क्षेत्र | सहकारी संस्थामार्फत चालविण्यात येणारी दुकाने | | व्यक्तिमार्फत चालविण्यात येणारी दुकाने | |
|---|---|---|---|---|
| | एकांकांची किमान संख्या | एकांकाची कमाल संख्या | एकांकांची किमान संख्या | एकांकाची कमाल संख्या |
| मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र | ३,००० | १०,००० | ३,००० | ८,००० |
| इतर नागरी क्षेत्र | २,००० | ८,००० | २,००० | ६,००० |
| ग्रामीण क्षेत्र | १,००० | ५,००० | १,००० | ४,००० |

मात्र, उपरोक्त विहित केलेल्या एकांकांच्या किमान संख्येच्या मर्यादेमुळे, प्रत्येक महसूल ...रास्तभाव उघडण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयास किंवा किमान एकांक संख्येपेक्षा कमी-

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

एकांकांकरिता कार्डधारकांच्या सोयीसाठी नवीन दुकान मंजूर करण्याचा अधिकार राज्य शासनाने राखून ठेवला आहे.

३. रास्त भाव / शिधावाटप दुकानास जोडावयाच्या एकांकांची वरील मर्यादा महिला आर्थिक विकास महामंडळ, मार्केटींग फेडरेशन, कंझ्युमर्स फेडरेशन, विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटींग सोसायटी, अपना बाजार आणि सुपर बाजार यांना मंजूर करण्यात आलेल्या दुकानांना लागू होणार नाही.

४. राज्यशासनाने शुभ्र शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य खाद्यतेल व साखरेच्या वितरणातून वगळले असल्यामुळे उपरोक्त किमान व कमाल एकांक संख्येची गणना करताना शुभ्र शिधापत्रिकेवरील एकांकाची संख्या विचारात घेऊ नये.

५. कोणत्याही क्षेत्रात नवीन रास्तभाव /शिधावाटप दुकान मंजूर करताना त्या क्षेत्रात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या दुकानास जोडलेल्या युनिटची संख्या, कमाल युनिटच्या मर्यादेपेक्षा त्या क्षेत्रासाठीच्या व्यतिरिक्त दुकान मंजूर करण्याच्या किमान एकांकाच्या संख्येने अधिक झाल्यानंतरच नवीन शिधावाटप दुकान मंजूर करण्यासाठी जाहिरनामा काढण्यात यावा. या जाहिरनाम्यानंतर पात्र ठरणा-या व्यक्ती किंवा संस्थेस मूळ दुकानाच्या कमाल एकांके संख्येपेक्षा अधिक असणारी सर्व एकांके जोडण्यात यावीत.(उदा.मुंबई शिधावाटप क्षेत्रात संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या शिधावाटप दुकानाच्या क्षेत्रात १० हजार अधिक ३ हजार अशी १३ हजार एकांके झाल्यानंतरच नवीन शिधावाटप दुकानासाठी जाहिरनामा काढण्यात यावा. अशा जाहिरनाम्यानंतर व्यक्ती किंवा संस्थेस .मूळ दुकानात १० हजार पेक्षा अधिक असणारी सर्व एकांके जोडण्यात यावीत.)

६. ज्यावेळी अस्तित्वात असलेल्या दोन किंवा त्यापेक्षा अधिक दुकानांमधून एकांके काढून घेऊन त्यासाठी नवीन दुकान मंजूर करावयाचे असेल, अशा प्रकरणी अस्तित्वातील सर्व दुकानांकडे त्यांच्याकरिता विहित केलेल्या कमाल मर्यादेइतकी एकांके निश्चितपणे राहतील याची दक्षता घेण्यात यावी व त्यापेक्षा अधिक ठरणारी विचाराधीन सर्व दुकानांमधील कमाल मर्यादेपलिकडील सर्व एकांके काढून नवीन रास्तभाव दुकानास जोडण्यात यावी. असे करताना नवीन दुकानास जोडावयाची एकांकाची संख्या त्याकरिता विहित केलेल्या मर्यादेपेक्षा उपरोक्त अनु.क्र.३ प्रमाणे अधिक ठरत असल्यास त्याकरिता आणखी एक नवीन दुकान उघडण्यात यावे.(उदा.मुंबई.ठाणे शिधावाटप क्षेत्रात अ.ब व क या सहकारी संस्थामार्फत चालविल्या जाणा-या दुकानांची सध्याची एकांक संख्या अनुक्रमे १४ हजार, १३ हजार व १५ हजार अशी



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

(५३)

असल्यास या तीनही दुकानांमधून अनुक्रमे ४०००, ३००० व ५००० अशी एकूण १२००० एकांके काढून घ्यावीत व त्यासाठी जाहिरनाम्यानंतर व्यक्ती पात्र ठरल्यास अशा नवीन दुकानास ८००० एकांके जोडावीत व उरलेल्या ४००० एकांकासाठी पुन्हा नव्याने जाहिरनामा काढण्यात यावा.)

७. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर काढण्यात येणाऱ्या सर्व जाहिरनाम्यांना लागू रहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( गां. जो. जाधव )
कार्यासन अधिकारी,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

...ज्यपालांचे सचिव
...प्रमंत्र्यांचे सचिव
...मुख्यमंत्र्यांचे सचिव
...चिव
...मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग
...गीय आयुक्त
...आयुक्त (पुरवठा)
...धिकारी/सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी
...वाटप, मुंबई
...पुरवठा अधिकारी/सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
...गार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
...अवर सचिव/कार्यासने,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
...सर्व मंत्री कार्यालये/सर्व राज्यमंत्री कार्यालये
...मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे कार्यालय
...मा. राज्य मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे कार्यालय
...पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
...ची निवड नस्ती
...माहिती व जनसंपर्क संचालनालय.
...क्ष, महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार फेडरेशन, २०७०, मान महंमद स्ट्रीट, पुणे कॅम्प, पुणे - ४११ ००१"

@@@@@@@@@@

Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

## नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकान मंजूरीसाठी एकांक संख्या व कार्यपध्दतीबाबत

महाराष्ट्र शासन

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन शुध्दिपत्रक क्रमांकःसाविव्य- १०००/२३७०/प्र.क्र.२१७/२०००/नापु २८

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२

दिनांक :- २८ जुलै, २०००

संदर्भ :- १) शासन निर्णय,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. क्रमांकःसाविव्य १०११/ २४२४/प्र.क्र.६१७८/नापु २८, दिनांक १२नोव्हेंबर,१९९९

२) शासन निर्णय ,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. क्रमांकःसाविव्य १०००/ २३७०/प्र.क्र.२१७/२०००/नापु २८,दिनांक ९ जून २०००

### शासन शुध्दिपत्रक

नवीन रास्त भाव / शिधावाटप दुकानांसाठी एकांक संख्या व कार्यपध्दती उपरोक्त दिनांक ९ जून २००० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यांत आलेली आहे. त्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील तक्त्याखाली दिलेल्या" मात्र, उपरोक्त विहित केलेल्या एकांकाच्या किमान संख्येच्या मर्यादेमुळे, प्रत्येक महसूली गावात रास्तभाव दुकान उघडण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयास किंवा किमान एकांक संख्येपेक्षा कमी एकांककरिता कार्डधारकांच्या सोयीसाठी नवीन दुकान मंजूर करण्याचा अधिकार राज्य शासन राखून ठेवत आहे." या आदेशात खालील प्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

" मात्र, उपरोक्त विहित केलेल्या एकांक किमान संख्येच्या मर्यादेमुळे या किमान संख्येपेक्षा कमी एकांक संख्या असलेल्या महसूली गावात नवीन रास्त भाव दुकान उघडण्यास कोणतीही बाधा येणार नाही. म्हणजेच, उपरोक्त किमान एकांक संख्येच्या मर्यादेपेक्षा कमी एकांक संख्या असलेल्या ज्या महसूली गावात सद्यस्थितीत दुकान अस्तित्वात नाही त्या गावामध्ये, प्रत्येक महसूली गावात नवीन दुकान उघडण्याच्या धोरणानुसार नवीन रास्त भाव दुकान उघडण्यांत यावे.त्यासाठी शासनाच्या मंजूरीची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे ज्या गावामध्ये सद्यस्थितीत एक किंवा त्यापेक्षा अधिक दुकान/ दुकाने अस्तित्वात आहे अशा गावामध्ये अतिरिक्त दुकान उघडताना उपरोक्त

1000 units पेक्षा कमी units असले तरी स्वतंत्र महसूली गावात दुकान मंजूर करावे.

Scanned by CamScanner

... किमान एकांक संख्येपेक्षा कमी एककांकरिता कार्डधारकांच्या सोयीसाठी नवीन दुकान मंजूर करण्याचे अधिकार राज्य शासन राखून ठेवत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२८.७.२०००

( पां. ज्ञो. जाधव )

कार्यासन अधिकारी,

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव

मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव

मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव

मुख्य सचिव

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग

सर्व विभागीय आयुक्त

सर्व उप आयुक्त (पुरवठा)

सर्व जिल्हाधिकारी/सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी

नियंत्रक शिधावाटप मुंबई

सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

वित्तीय सल्लागार व उप सचिव,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई

सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासने,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

खाजगी सचिव,सर्व मंत्री कार्यालये/सर्व राज्यमंत्री कार्यालये

खाजगी सचिव,मा.मंत्री,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे कार्यालय

खाजगी सचिव,मा.राज्यमंत्री,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे कार्यालय

सचिव,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.

कार्यासन नापु २८ ची निवड नस्ती.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय

यांना माहितीसाठी.

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार फेडरेशन, २०५०, जान महंमद स्ट्रीट, पुणे कॅम्प,पुणे ४११ ००१.